# **जाहीर निवेदन**

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-2022/प्र.क्र.11 (भाग-1)/आस्था-8 दि.06/09/2023 अन्वये माहे मार्च 2019 व माहे ऑगस्ट, 2021 अपंग व इतर सुधारीत आरक्षणासह) महाभरती अंतर्गत अर्ज करण्यात आलेल्या उमेदवारांना परीक्षा शुल्काची रक्कम संबंधित उमेदवारांना परत करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने जिल्हा परिषद, सोलापूर च्या आस्थापनेवरील सन 2019 मधील जाहीरातीत नमूद गट-क संवर्गामधील रिक्त पदे व ऑगस्ट 2021 मधील जाहिरातीत नमूद गट क मधील आरोग्य विभागाच्या अधिनस्त संवर्गातील सरळसेवेने पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

शासन निर्णय दिनांक 21.10.2022 मधील निर्णयान्वये सदर भरती प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. उपरोक्त परिक्षाकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांना त्यांचे परिक्षा शुल्क परत करण्याच्या अनुषंगाने https://maharddzp.com या संकेत स्थळावर लिंक उमेदवारांसाठी दि.05/09/2023 पासून सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार सन 2019 व सन 2021 च्या भरती प्रक्रियेत ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केलेले आहेत, अशा उमेदवारांनी आवश्यक बँक खाते क्रमांक व इतर तपशिलासह उपरोक्त लिंकद्वारे माहिती भरावी. तदनंतर प्राप्त माहितीची पडताळणी करून संबंधितांच्या बँक खात्यावर रकमेचे प्रदान करण्यात येईल. असे सर्व उमेदवारांना या जाहिर निवेदनाद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

**(स्मिता म पाटील)**
जिल्हा निवड समिती सदस्य सचिव तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा)
जिल्हा परिषद,सोलापूर

**(मनिषा आव्हाळे,भाप्रसे)**
जिल्हा निवड समिती सदस्य तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,सोलापूर

**(कुमार आशीर्वाद,भाप्रसे)**
जिल्हा निवड समिती अध्यक्ष तथा
जिल्हाधिकारी,सोलापूर